नि.दि.दा.क्र. १७९/२०१३
बळवंत वगैरे वि. सचिन व इतर

निशाणी क्र.९० वरील आदेश

प्रतिवादी क्र.८अ यांनी सदरचा अर्ज त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवुन कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींचे विरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीद व त्या अनुषंगीक इतर मागण्यांकरिता दाखल केला आहे. दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.८ व ९ तर्फे नि.४१ लगत दिनांक ११.०८.२०१४ रोजी दाव्याची कैफियत दाखल केली आहे. नि.क्र.५८ वर मुद्दे काढण्यात आले असुन दाव्याचे कामकाज प्रलंबीत असताना, प्रतिवादी क्र.८ चारुशिला नरेश कदम या दिनांक २६.०२.२०१९ रोजी मयत आहेत. त्याबाबतच त्यांच्या वारसांबाबतची दुरुस्ती करुन प्रतिवादीस दाव्यात दिलेल्या पत्त्यावर समन्स काढणेचा अर्ज दिला होता. त्यावर नि.क्र.७१ लगत प्रतिवादी क्र.८ व ८ब हे दिलेल्या पत्त्यावर आढळुन येत नाहीत असा रिपोर्ट आला असता त्यांचा नवीन पत्ता या कामी देण्यात आला नसल्याने दैनिक प्रभात या वर्तमानपत्रात कि जे वर्तमानपत्र पुणे जिल्हयामध्ये फारसे वितरित केले जात नाही. अशा वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देवुन व ती नि.क्र.८२ च्या अहवाल समन्स न बजावता परत आलेला असता त्याबाबत कोणतीही तजवीज न करता प्रतिवादी क्र.८अ व ८ब विरुध्द एकतर्फा आदेश पारीत करुन घेतला असुन प्रतिवादी क्र.८अ यांच्यावर नियमाप्रमाणे समन्सची बजावणी झालेली नाही. तसेच प्रतिवादी क्र.८ब हे मयत झालेले आहेत. त्याबाबतची माहीती वादीस असुनही तशी कोणतीही तजवीज न करता वादीने जो एकतर्फा आदेश प्रतिवादी क्र.८अ विरुध्द घेतला आहे तो मुलतः चुकीचा व अयोग्य असुन त्याची माहीती प्रतिवादी ८अ यास नुकतीच मिळाली. त्यानंतर प्रतिवादी क्र.८अ स्वतः हजर होत आहेत त्यास वेगळ्या समन्सची आवश्यकता नाही. दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालविण्याचे असल्याने न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी क्र.८अ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात यावा. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नसुन वादीस त्यांची कैफियत दाखल करुन दाव्याचे कामकाज चालविण्याबाबत योग्य ती संधी मिळणार आहे. याकरिता प्रतिवादी क्र.८अ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रुद्द करण्यात यावा.

३. सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकुर नाकारला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र.८अ यांनी केवळ दाव्याचे कामकाज

लांबविण्याचे हेतुने सदरचा अर्ज जाणुनबुजुन दिला आहे. सदरचे काम जुने असुन वादी यांचे वय ७८ वर्षाचे आहे व ते आजारी असतात. अर्ज नामंजुर करण्यात यावा व मंजुर करावयाचा झाल्यास जास्त खर्चासह मंजूर करण्याची वादींनी विनंती केली आहे.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द जाहीर ठराव, निरंतर ताकीद व त्या अनुषंगाने इतर मागण्यांसाठी दाखल करण्यात आला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की प्रतिवादी क्र.८अ यांच्यावर निशाणी क्र.८५ चे जाहीर समन्स नुसार दिनांक १९-१२-२०२४ चे दै.प्रभात या वर्तमानपत्राद्वारे बजावणी करण्यात आलेली आहे. परंतु ते गैरहजर राहिल्याने त्यांच्या विरुध्द दिनांक ५.०३.२०२५ रोजी दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.८अ यांनी हजर होवुन दिनांक २२.०४.२०२५ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व सोबत प्रतिवादी क्र.३,८ व ९ यांनी नि.क्र.४१ लगत दिलेली कैफियत हीच त्याची कैफियत समजण्यात यावी असे पुरशीस दिली आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादी क्र.८अ यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होणे आवश्यक वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफीयत प्रस्तुत प्रतिवादींना मान्य असल्याबाबतची पुरशीस रेकॉर्डवर घेणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी यांनी वादी यास खर्चाची रक्कम देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

<u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र.९०) रक्कम रुपये २००/- (रक्कम रुपये दोनशे फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येतो. सदरची रक्कम वादींना देण्यात यावी.

२. प्रतिवादी क्र.८अ यांनी वरील पुर्तता केल्यानंतर त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांची कैफीयत रेकॉर्डवर घेण्यात येते.

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.08.30 17:46:25 +0530

स्थळ : वाई
(आर.एम.भेंडे)

दिनांक : १९/०८/२०२५
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर वाई.